**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातमीपत्र**

**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः11.03.2025** **वारःमंगळवार**

---

**ठळक बातम्या**

- शेती, उद्योग, पर्यटन, पायाभूत सुविधा आणि सामाजिक विकास क्षेत्रांसाठी भरीव तरतूद असलेला आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडून सादर
- संगमेश्वरमध्ये छत्रपती संभाजी महाराजांचं तसंच आग्रा आणि पानिपत इथंही भव्य स्मारक उभारण्याची अर्थसंकल्पात घोषणा
- हा अर्थसंकल्प लोकाभिमुख आणि संतुलित असल्याची मुख्यमंत्र्यांची प्रतिक्रिया; तर जनतेची फसवणूक करणारा अर्थसंकल्प असल्याची विरोधकांची टीका
- विधान परिषदेच्या 5 जागांच्या  निवडणुकीसाठी अधिसूचना जारी
- आणि
- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ट्रक उलटून झालेल्या अपघातात सहा जणांचा मृत्यू, 11 जण जखमी

**अर्थसंकल्प**

राज्याचा आगामी आर्थिक वर्षाचा 7 लाख 20 कोटी रुपयांचा आणि सुमारे 45 हजार 891 कोटी रुपये तुटीचा अर्थसंकल्प अर्थमंत्री अजित पवार यांनी काल विधानसभेत सादर केला. विधान परिषदेत अर्थराज्यमंत्री आशिष जैस्वाल यांनी अर्थसंकल्प मांडला. आगामी आर्थिक वर्षात महसुली जमा पाच लाख 60 हजार 964 कोटी रुपये तर महसुली खर्च सहा लाख सहा हजार 855 कोटी रुपये अंदाजित असल्याचं, या अर्थसंकल्पात म्हटलं आहे. 2025-26 ची राजकोषीय तूट 1 लाख 36 हजार 235 कोटी रुपये आहे. त्यामुळं राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या 3 टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यातही शासन

यशस्वी ठरल्याचं अर्थमंत्री म्हणाले. तसंच राज्याची महसुली तूट सातत्याने स्थूल राज्य उत्पन्नाच्या 1 टक्क्यापेक्षा कमी राहिली आहे, असं त्यांनी सांगितलं. ऐकुया या अर्थसंकल्पातील काही ठळक मुद्दे

**राज्याचं नवीन औद्योगिक धोरण, कामगार धोरण, गृहनिर्माण धोरण तसंच आरोग्य आणि ज्येष्ठ नागरिक धोरण लवकरच जाहीर करण्याची घोषणा अर्थमंत्री अजित पवार यांनी काल केली. मुंबई महानगर प्रदेश हे आंतरराष्ट्रीय दर्जाचं आर्थिक विकास केंद्र, म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला असून या दृष्टीनं मुंबईत सात ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाची व्यापार केंद्र उभारण्यात येणार आहेत. नवी मुंबईत 250 एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर, उभारण्यात येणार आहे. एकेकाळी नक्षलग्रस्त जिल्हा अशी ओळख असलेला गडचिरोली जिल्हा पोलाद निर्मितीचं केंद्र म्हणून उदयाला येत असून तिथल्या पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी पहिल्या टप्प्यात सुमारे 500 कोटी रुपये किंमतीची कामं हाती घेण्यात येणार आहेत. मुंबई, नागपूर आणि पुण्यामध्ये सुमारे 144 किलोमीटर लांबीचे मेट्रो मार्ग कार्यान्वित करण्यात आले आहेत. येत्या वर्षात मुंबईमध्ये 41 किलोमीटर, तर पुण्यात 23 किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्गाची कामं सुरू होणार आहेत, असं अजित पवार यांनी सांगितलं. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून यावर्षी एप्रिलमध्ये देशांतर्गत विमानसेवा सुरु करण्याचं नियोजन आहे. राज्यातल्या इतर विमानतळासाठीही आवश्यक सुविधा आणि विकासाची काम केली जाणार आहेत. राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या 6 हजार डिझेल बसचे रुपांतर सीएनजी आणि एलएनजी बसमध्ये करण्याची प्रक्रिया सुरु आहे. कृषी क्षेत्रासाठीही या अर्थसंकल्पांत अनेक तरतुदी असून नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पासाठी येत्या वर्षात 351 कोटी 42 लाख रुपयांचा निधी प्रस्तावित आहे. कृषि क्षेत्रामध्ये कृत्रिम बुध्दिमत्ता आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराचं धोरण आखण्यात येत आहे. राज्यातील अपूर्ण सिंचन प्रकल्पांची कामं पूर्ण करण्यावर राज्य सरकारचा भर असून जलयुक्त शिवार अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याअंतर्गत दीड लाखाहून अधिक काम पुढच्या वर्षी मार्चपर्यंत पूर्ण करण्याचं नियोजन आहे. गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार ही योजना राज्यात कायमस्वरुपी राबविण्यात येणार आहे. मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजनेअंतर्गत 7 पूर्णांक 5 अश्वशक्तीपर्यंतच्या 45 लाख कृषी पंपांना मोफत वीज पुरवण्यात येत आहे. राज्यातील बांबू उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी 4300 कोटी रुपये किमतीचा बांबू लागवड प्रकल्प राबवण्यात येणार आहे.राज्यातील मागासवर्गीय आणि दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी, तसंच असंघटिक कामगार, क्रीडा क्षेत्र, आणि गुन्ह्याचा तपास करण्याकरता अत्याधुनिक यंत्रणांच्या उभारणीसाठी निधीची तरतूद केली असल्याचं अर्थ मंत्र्यांनी सांगितलं.**

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत बोलताना ते म्हणाले,**

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत 2 कोटी 53 लाख लाभार्थी महिलांना जुलै 2024 पासून आर्थिक लाभ देण्यात येत आहे त्यासाठी आत्तापर्यंत 33 हजार 232 कोटी खर्च झालेला आहे. 2025 26 मध्ये या योजने साठी 36 हजार कोटी रुपयांचा नियत्वे प्रस्तावित आहे . या योजनेमधून मिळणाऱ्या अनुदानाचा उपयोग काही महिला गटांनी आर्थिक उपक्रमासाठी वीज भांडवल म्हणून केला असून अशा गटांना आणखी प्रोत्साहन देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्याचं आमच्या विचाराधीन आहे.**

**पर्यटन विकासाच्या दृष्टीनंही अनेक घोषणा या अर्थसंकल्पांत करण्यात आल्या. राज्यात सागरी पर्यटनाला प्रोत्साहन देणं तसंच प्राचीन मंदिरांचं जतन, संवर्धन आणि परिसर विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे. महानुभव पंथाच्या श्रध्दास्थानांच्या विकासाची कामं हाती घेण्यात येणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराज आग्र्यात नजरकैदेत होते, त्या ठिकाणी स्मारक उभारणं, हरियाणातील पानिपत इथही स्मरकाची उभारणी आणि संगमेश्वर इथ छत्रपती संभाजी महाराजांचं भव्य स्मारक उभारण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. पुण्यातील शिवसृष्टीच्या उर्वरित कामासाठी निधी दिला जाणार आहे; तसंच छत्रपती संभाजी महाराजांचे पवित्र बलिदानस्थळ असलेल्या तुळापूर आणि वढु बुद्रुक इथ त्यांच्या भव्य स्मारकाचं काम प्रगतीपथावर आहे, असं अजित पवार म्हणाले. यापुढे दरवर्षी 3 ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा सन्मान दिन, आणि 3 ते 9 ऑक्टोबरदरम्यान अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्यात येईल. तसंच मराठी भाषेच्या संशोधनातील उल्लेखनीय कामगिरीसाठी पुरस्कार सुरु करण्यात येणार असल्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली.**

## अर्थ संकल्प प्रतिक्रिया

आगामी वर्षाचा अर्थसंकल्प हा विकसित महाराष्ट्राचा संकल्प साकार करणारा, लोकाभिमुख आणि संतुलित अर्थसंकल्प असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. या अर्थसंकल्पात शेती, उद्योग, पायाभूत सुविधांबरोबरच रोजगार आणि सामाजिक विकास अशी पंचसूत्री आहे, असं ते म्हणाले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना एकवीसशे रुपये देण्याचं आश्वासन पूर्ण करण्यासाठी नियोजन सुरू आहे, असं त्यांनी काल अर्थसंकल्पानंतर पत्रकार परिषदेत जाहीर केलं. या अर्थसंकल्पात कुठल्याही प्रकारे योजनांना कात्री लावलेली नाही. उलट पायाभूत सुविधांच्या विकासांना वेग दिल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. तर राज्याच्या तिजोरीत अधिकाधिक निधी येण्यासाठी केलेल्या तरतुदींची माहिती अर्थमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिली.

महायुती सरकारने निवडणूक काळात दिलेल्या एकाही आश्वासनाची पूर्तता अर्थसंकल्पात केली नाही. या अर्थसंकल्पाद्वारे सरकारने जनतेची फसवणूक केल्याची टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. शेतकरी आणि लाडक्या बहिणींची फसवणूक करणारा हा अर्थसंकल्प असल्याचं विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले. या अर्थसंकल्पात एसटी, रेल्वेने प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य, गरीब, मध्यमवर्गीयांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलं असल्याची टीका माजी अर्थमंत्री जयंत पाटील यांनी केली. तर राज्यात आर्थिक बेशिस्तीचा कारभार सुरू असून हे सरकार राज्याला कर्जबाजारी करून देशोधडीला लावणार, असा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी केला.

**संसद अधिवेशन**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं दुसरं सत्र कालपासून सुरु झालं. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी चालू आर्थिक वर्षासाठी विविध विभागांच्या खर्चासाठी 51 हजार 462 कोटी 86 लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या.  रेल्वे सुधारणा विधेयक काल राज्यसभेत मंजूर झाल्यामुळे या विधेयकाला आता संसदेची मंजुरी मिळाली आहे.

**निवडणूक**

केंद्रीय निवडणूक आयोगानं काल विधानपरिषदेच्या 5 जागांच्या  निवडणुकीसाठी अधिसूचना जारी केली. निवडणुकांसाठी 17 मार्च पर्यंत  अर्ज दाखल करता येतील, 18 मार्चला अर्जांची छाननी होईल आणि 20 मार्चपर्यंत अर्ज मागे घेता येतील. आवश्यकता वाटल्यास 27 मार्च रोजी मतदान होईल आणि त्याच दिवशी संध्याकाळी 5 वाजता मतमोजणी होईल.

**अपघात**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात काल पहाटे एक ट्रक उलटून झालेल्या अपघातात सहा कामगारांचा मृत्यू झाला, तर 11 जण जखमी झाले आहेत. ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रकच्या चालकाचं पिशोर घाटात नियंत्रण सुटल्यानं हा अपघात झाला. उसाच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्या चार कामगारांचा जागीच तर 2 कामगारांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

**उष्माघात**

राज्यात उन्हाची तीव्रता वाढू लागली असून उष्माघाताच्या चार रुग्णांची राज्यात नोंद झाली आहे. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य विभागाने सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये उष्णतेशी संबंधित आपत्कालीन

उपचारांसाठी विशेष कक्ष उभारले आहेत. नागरिकांनी उन्हात बाहेर पडताना योग्य काळजी घ्यावी असं आवाहन आरोग्य विभागाने केलं आहे.

**हवामान**

येत्या 24 तासात विदर्भात काही ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता असून कोकणात उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**